**सं. फौ. ख. क्र. ३६/२०१८**
**सविता ओव्हाळ वि. गंगाराम मोहिते वगैरे.**
नि. क्र. ५३

**रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एस्. डी. कमलाकर)**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २१ अन्वये आरोपीचे प्रतिकथन

| | | |
|---|---|---|
| १ | **गुन्हा घडल्याची तारीख** | २७.१२.२०१७ |
| २ | **फिर्याद दाखल केल्याची दिनांक** | ११.०१.२०१८ |
| ३ | **फिर्यादीचा नाव व पत्ता** | सविता काशिनाथ ओव्हाळ, वय ४५ वर्षे रा. तिसे बौद्धवाडी, ता. रोहा. |
| ४ | **आरोपीचे नाव, वय व पत्ता** | १. गंगाराम देवू मोहिते.<br>वय ५० वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br><br>२. राकेश रविंद्र कांबळे.<br>वय २८ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br><br>३. प्रफुल्ल तुकाराम कांबळे.<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br><br>४. सचिन हरीभाऊ जाधव,<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br><br>५. ऋषिकेश रविंद्र कांबळे,<br>वय २५ वर्षे, व्यवसाय– मजूरी, |

६. संगिता जनार्दन कांबळे,
वय ४५ वर्षे, व्यवसाय– मजूरी,

७. रोहीत रविंद्र कांबळे,
वय २२ वर्षे, व्यवसाय– मजूरी,

८. राजेश वसंत शिंदे,
वय २८ वर्षे, व्यवसाय– मजूरी,

९. विकेश जनार्दन कांबळे,
वय २६ वर्षे, व्यवसाय– मजूरी,
सर्व रा. तिसे बौद्धवाडी, ता. रोहा, जिल्हा रायगड.

५ **गुन्हयाचा तपशील**

तुम्ही दि.२७.१२.२०१७ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वा. च्या सुमारास मौजे तळवली बौद्धवाडी, ता. रोहा येथे तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादी सुनंदा गायकवाड हिचे घराकडे जात असताना हरिभाऊ कांबळे यांच्या घरासमोर आली असता तुम्ही फिर्यादीचा रस्ता आडवून तिला गैरनिरोध केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३४१** सह **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीच्या अंगावर मारण्यास जावून तिच्यावर हमला केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३५२** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीस ''तू काय सदस्य आहेत ? जास्त माज करू नको' असे म्हणून तिला शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड

विधानाच्या कलम **५०४** सह **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीस 'सदस्य पुढे आलीस तर तुझी तंगडी तोडून हातात देईन, सुनंदा गायकवाडला जसे मारले आहे तसे या दोघींना मारायला पाहिले, जास्त करायला लागली तर तुला आणि तुझ्या मुलाला बघू' असे म्हणून तिला जीवे मारण्याच्या धमक्या देवून धाकट पटशा केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **५०६** सह **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त गुन्हयाचा तपशील आरोपींस मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

६ आरोपींचे प्रतिकथन

१. तुम्हाला फिर्याद व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?

उत्तर– होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?

उत्तर– होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर– आम्हाला गुन्हा कबूल नाही.

दिनांक – २७–०२–२०२०

१.

२.

३.

४.

५.

६.

७.

८.

९.

Sameer Dilip Kamalakar
Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2020.02.27 14:44:09 +0000

आरोपींची सही (स. दि. कमलाकर)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.